**प्रेसनोट दिनांक १२/०३/२०१९**

**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**

चंदननगर पो.स्टे. गु.र.नं. ८५/२०१९, भा.द.वि.क.३७९ मधील फिर्यादी नामे अजितकुमार रामदयाल कनोजिया, रा. पंचशिल लेबर कॅम्प, ढोलेपाटील कॉलेज खराडी, पुणे यांनी दि. २०/०२/१९ रोजी ११.३० वा. चे सुमारास पंजाब नॅशनल बँक एटीएममध्ये, खराडी, पुणे येथे त्यांचेजवळील रियल मी २ प्रो कंपनीचा मोबाईल हँडसेट रु.८०००/- किंमतीचा बाजुस ठेवुन पैसे मोजत असतांना अज्ञात आरोपीने त्यांच्या संमतीशिवाय चोरुन नेला होता. बाबत वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरील गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक – कृष्णा इंदलकर यांचे सुचनांप्रमाणे चालु असतांना आरोपी नामे आरोपी नामे अरुण महाराजबली शुक्ला, वय २६ वर्षे, रा. रामनगर, बैजलपुर, घमडाची, बलसाड, गुजरात याचा माग काढुन, तो वलसाड येथे राहात असलेची माहिती मिळालेली होती. त्याप्रमाणे सदर ठिकाणी तात्काळ इकडील पोलीस ठाणेचे सपोफौ. अनिल रिकीबे, पोना. ७००७, शकुरखान पठाण यांना वलसाड येथे पाठवुन, आरोपीचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन वरील गुन्हयामध्ये दि.११/०३/१९ रोजी अटक करण्यात आलेली आहे. तसेच त्याचेकडुन मोबाईल हँडसेट रु. ८०००/- किंमतीचा जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची चांगली कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. सुनिल फुलारी सो, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, श्री अक्कानवरू सो, सहा पोलीस आयुक्त येरवडा विभाग डॉ. श्री. शिवाजी पवार सो. यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. कृष्णा इंदलकर, पो.नि.गुन्हे - राजेंद्र काळे, सपोफौ. अनिल रिकीबे, पोना. शकुरखान पठाण, पोहवा. तानाजी पवार यांनी केलेली आहे. सदर आरोपीसह घेण्यात आलेला फोटो यासोबत सादर करीत आहोत.